प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. २७.०९.२०२१

**नवी मुंबई मेट्रोला दूरसंचार विभागाकडून डायनॅमिक क्लिअरन्स प्रमाणपत्र प्रदान**
**प्रवासी वाहतूक सुरू करण्याच्या दिशेने गाठला महत्त्वाचा टप्पा**

सिडको महामंडळाच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील बेलापूर ते पेंधर या मार्ग क्र. १ वर धावणाऱ्या मेट्रोकरिता केंद्रीय दूरसंचार विभाग यांच्याकडून नुकतेच विद्युतीकरणविषयक डायनॅमिक क्लिअरन्स प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. यामुळे सदर मेट्रो मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला आहे.

**"डायनॅमिक क्लिअरन्स प्रमाणपत्र आणि सेफ्टी केस प्रमाणपत्र प्राप्त झाल्याने नवी मुंबई मेट्रो प्रकल्पामधील एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. यानंतर आयएसए प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येईल. त्यापुढील टप्प्यात आरडीएसओचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर वाणिज्यिक परिचालन चाचणी घेण्यात येईल."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडको महामंडळाकडून नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण ४ मार्ग साकारण्यात येत असून बेलापूर ते पेंधर या ११ कि.मी. च्या मार्ग क्र. १ वर धावणाऱ्या मेट्रोची आरडीएसओ (रिसर्च डिझाईन अॅन्ड स्टँडर्ड ऑर्गनायझेशन) यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच ऑसिलेशन चाचणी घेण्यात आली आहे. सदर मेट्रो मार्गाचे विद्युतीकरण करण्यासंदर्भात केंद्रीय दूरसंचार विभागाकडून या मार्गावरील स्थानक क्र. १ ते १० या भागाची पाहणी करण्यात येऊन डायनॅमिक क्लिअरन्स प्रमाणपत्र देण्यात आले. यानंतर पुढील टप्प्यात मेट्रो मार्ग क्र. १ वर आयुक्त, मेट्रो रेल्वे सुरक्षा (सीएमआरएस) यांच्या देखरेखीखाली वाणिज्यिक परिचालन चाचणी घेण्यात येईल.

---

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**